# सर्व साधारण सूचना

१. जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत विभाग स्तरावरील सहाय्यक अभियंता संवर्गाची पदे भरण्याकरिता सेवा निवृत्त सहाय्यक अभियंतांची नामिकासूची (Panel) तयार करण्यात येत आहे.

२. सदर पदे भरण्याकरिता सहाय्यक/कनिष्ठ अभियंता संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या व विहीत गुणवत्ता धारण करणाऱ्या सहाय्यक अभियंत्यांकडून खालील सर्वसाधारण अटी व शर्तीचे अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

   i. पात्र अभियंत्यांची नामिकासूची (Panel) तयार करण्यात येईल व नामिकासूचीची वैधता ३ वर्षाकरिता असेल. नामिकासूचीतील अभियंत्यांची आवश्यकतेनुसार प्रकल्पात नियुक्ती केली जाईल.

   ii. प्रकल्पातील सहाय्यक अभियंता पदासाठी अर्ज करणाऱ्या सेवा निवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु नसावी.

   iii. प्रकल्पातील नियुक्ती प्रथम एक वर्षाकरिता व तदनंतर आवश्यकतेनुसार कमाल २ वर्षाकरिता अशी कमाल ३ वर्षाकरिता असेल. असे असले तरी प्रस्तुत नियुक्त्या हया प्रकल्पासाठी मंजुर पदांवर केल्या जात असल्याने शासनाकडून नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

   iv. प्रकल्पामार्फत दिले जाणारे परिश्रमिक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार असतील.

   v. वयोमर्यादा सेवा निवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंता नियुक्तीनंतर वयाच्या ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील. आवश्यकतेनुसार सदरची वयोमर्यादा ७०वर्षापर्यंत सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने वाढविण्यात येईल.

   vi. नामिकासूचीकरिता अर्ज करणारा सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंता शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

   vii. नियुक्त सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यास प्रकल्पात नियमित होणेबाबत कोणतेही अधिकार / हक्क नसतील.

   viii. नियुक्ती सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवा गैरर्वतन, कामकाजात चुकारपणा, आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, हितसंबंध संघर्ष (Conflict of interest) इ. कारणास्तव समाप्त करण्याचे अधिकार प्रकल्पास राहतील.

   ix. वरील अटी व शर्ती शिवाय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदी लागू राहतील.

३. जाहिरातीमध्ये नमुद पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव व कामाचे स्वरूप या बाबतचा तपशील https://www.smart-mh.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रकल्पाच्या गरजेनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार प्रकल्पाने राखून ठेवले आहेत.

४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,अनुभव व इतर अनुषंगिक कागदपत्रे /प्रमाणपत्रे स्वस्वाक्षरीत करून सादर करणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जावरील फोटोवर स्वाक्षरी करावी.

५. सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांनी अर्जासोबत महालेखाकार यांचे सेवानिवृत्ती वेतन आदेश सादर करावेत.

६. सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांनी विहित नमुन्यातील अर्ज https://www.smart-mh.org या संकेतस्थळावरून download करून परीपूर्ण अर्ज खालील पत्त्यावर दि.३०/१२/२०२२ रोजी सायकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावेत. विहित वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

प्रकल्प संचालक,
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
प्रकल्प समन्वय़ व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा,
सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६

७. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांना प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल.

८. जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिताची निवड प्रक्रिया, अटी शर्ती इ. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार राहतील.

९. निवड प्रक्रिया राबविण्याबाबतचे अंतिम अधिकार प्रकल्पाकडे राखीव असतील.

१०. मुलाखतीसाठी येणाऱ्या सेवानिवृत्त सहाय्यक/कनिष्ठ अभियंत्यांना प्रवास खर्च अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च प्रकल्पाद्वारे अदा करण्यात येणार नाही.

********************